# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 06/10/2023 (शुक्रवार) सकाळ


## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या तिन टिप्पर चालकाविरूद्ध स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

दिनांक ०६/१०/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस स्टेशन उमरेड परीसरात पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहीती मिळाली की, WCL उमरेड ते नागपूर रोड येथे अवैध रित्या रेतीची चोरटी वाहतूक होत आहे. अशी माहिती मुखबीरद्वारे माहिती मिळाल्याने नमुद घटनास्थळावर नाकाबंदी केली असता, १) टिप्पर क्र. MH40 AK 6455 चा चालक आरोपी नामे–१) छोटू विक्रम पंडित वय ३१ वर्ष, रा. शिर्डी नगर बहादुर फाटा नागपूर २) टिप्पर क्र. MH40 BG4799 चा चालक आरोपी नामे –२) फाल्गुन भुवनलाल वरखडे वय २५ रा पाचगाव उमरेड रोड नागपूर ३) टिप्पर क्र. MH 40 BL 4086 चा चालक आरोपी नामे– ३) शिवकुमार सुरपतदास कोटी वय ४३ रा. सुरगाव उंद्री कुही रोड नागपूर येतांनी दिसले. ट्रकचा चालकांना थांबवून तपासले असता सदर वाहनात आरोपी हे रेतीची चोरटी वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीतांच्या ताब्यातून १) टिप्पर क्र. MH40 AK 6455 २) टिप्पर क्र. MH40 BG4799 ३) टिप्पर क्र. MH 40 BL 4086 प्रत्येकी २०,०००००/– रु प्रमाणे एकूण ६०,०००००/– रु. व १८ ब्रास रेती प्रत्येकी ६०००/– रु ब्रास एकूण कींमती १०८०००/– असा एकूण ६१०८०००/– रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी, जप्त मुद्देमाल व कागदपत्रे पुढील कायदेशीर प्रक्रियेकरीता पोलीस ठाणे उमरेड यांचे ताब्यात देण्यात आले.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे– पोलीस उपनिरीक्षक आशिष मोरखेडे स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.), अपर पोलीस अधीक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोलीस उपनिरीक्षक आशिष मोरखडे, पोलीस हवालदार गजेंद्र चौधरी, अरविंद भगत, मयूर ढेकले, पोलीस अंमलदार राकेश तालेवार यांचे पथकाने केली.

## पो.स्टे. रामटेक हद्दीमधील मरारवाडी गावाजवळ जंगलात जुगार अड्डयावर धाड
## —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण ची कारवाई :—

दिनांक ०५/१०/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नागपूर ग्रामीण हद्दीत अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना पोलीस स्टेशन रामटेक परीसरातील पो.स्टे रामटेक हद्दीतील मरारवाडी गावाजवळ जंगलात काही इसम हे तासपत्यांवर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत असल्याची गोपनिय माहिती पथकास प्राप्त झाले वरून स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने मरारवाडी गावाजवळ जंगलात सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे—**१) विजेंद्र विष्णु सहारे, वय ३६ वर्ष, रा. मरारवाडी ता. रामटेक, २) प्रमोद कांतीलाल खैरे वय ३० वर्ष रा. मरारवाडी ता रामटेक ३) कापूरचंद भैयाजी ढवळे वय ४८ वर्ष रा.वाईतोला ता. रामटेक ४) रोशन वासुदेव वाघधारे वय ३० वर्ष रा. खुमारी ता रामटेक ५) जितेंद्र जिवानसिंग पंडेले वय २९ वर्ष रा. खुमारी ता रामटेक ६) आकाश रामदास वांगे वय २४ वर्ष रा.भोंडे वाडा ता रामटेक ७) स्वप्नील चेतराम हेनकुळे वय २६ वर्ष रा.भोंडे वाडा ता रामटेक असे एकुण ०७ इसम हे तासपत्यांवर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळतांना मिळुन आले. असे एकुण ०७ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन दोन मोटरसायकल किंमत ६५००० रु व रोख रक्कम १०७००/— रु असा एकूण ७५७००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपींताविरूध्द पोलीस ठाणे रामटेक येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवुन आरोपींना जप्त मुद्देमालासह पोलीस ठाणे रामटेक यांचे ताब्यात देण्यात आले असून पुढील तपास पोलीस ठाणे रामटेक करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से) तसेच मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गून्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, पोलीस हवालदार रोशन काळे, शंकर मडावी नितेश पिपरोडे, . विपीन गायधने, उमेश फुलबेल यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**